माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.११२७७/२१/अ.क्र.५८६८/२४/०१**

**श्री. मंगेश कदम**
विरुद्ध
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.
**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४</u>**

अपीलकर्ता : उपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१२.२०२० | ११.०१.२०२१ | १६.०२.२०२१ | २८.०६.२०२१ |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. ११.०१.२०२१ रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.२८.०६.२०२१ रोजीचे आदेश संलग्न करुन दि. २९.०९.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपीलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दिनांक २८.१२.२०२० नुसार "पी.ओ. क्रमांक ४१०००५१३३६ ट्रेंच कामाची मुद्येनिहाय माहिती खालीलप्रमाणे विचारलेली आहे :-

१. पर्चेस ऑर्डरच्या प्रती
२. मेजरमेंट बुक
३. स्थळ दर्शक नकाशा प्रती
४. प्रमाणपत्र प्रमाणपत्र
५. पी.ओ. प्रमाणे लिस्ट
६. काम सुरु असतांनाचे व पूर्ण झाल्याचे फोटो
७. व्हिजिलन्स ऑबर्झव्हेशन व कम्प्लायन्स रिपोर्ट सपोटिंग फोटोज

८. मटेरियल चलने

९. पेव्हर ब्लॉक चलन व रजिस्टर

१०. अस्पाल्ट (डांबर) चलने व रजिस्टर

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ११.०१.२०२१ रोजी अपिलार्थी यांना कळविले आहे की, अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.०२.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०६.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग यांनी अपीलार्थी यांना नमूद अर्जातील मागितलेल्या माहितीचे उत्तर दिलेले आहे" असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढले.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून जन महिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी दि. २८.१२.२०२० रोजी "पी.ओ. क्रमांक ४१०००५१३३६ ट्रेंच कामाची मुद्येनिहाय माहिती विचारणा केली आहे.

अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग यांनी अपीलार्थी यांना दि. ११.०१.२०२१ रोजी नस्तीचे निरिक्षण करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानंतर अपीलार्थी यांना माहिती चलन शुल्क रु. ११२/- भरण्यास कळविण्यात आले.

अपीलार्थी यांना माहिती चलन शुल्क भरल्यानंतर सुध्दा माहिती प्राप्त झाली नाही म्हणून प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०६.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग यांनी अपीलार्थी यांना नमूद अर्जातील मागितलेल्या माहितीचे उत्तर दिलेले आहे" असे आदेश पारीत केले आहे.

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, असे कारण नमूद करुन द्वितीय अपील अर्ज केला आहे.

अपीलार्थी यांनी आयोगासमोर असे सादर केले की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

अपीलार्थी यांचे असे निवेदन आहे की, प्रथम अपील आदेशात विसंगती आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी घेण्यात येईल.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग यांनी आजच्या सुनावणीस का उपस्थित राहू शकले नाहीत, याबाबतचा लेखी खुलासासह दिनांक १७.१२.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता सुनावणीस उपस्थित रहावे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.१२.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Com... Maharashtra

प्रदीप व्यास 19-11-2024

**( डॉ.प्रदीप व्यास )**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**

दिनांक :१९.११.२०२४